253

तारेचा पत्ता : स्थानिक निधी
मुख्य लेखा परीक्षक
निवासस्थान :
दुरध्वनी कार्यालय : 27571391
: 27572936

मुख्य लेखा परीक्षक,
स्थानिक निधी लेखा,
महाराष्ट्र राज्य यांचे कार्यालय,
कोकण भवन, सहावा मजला,
नवी मुंबई. 400 614.
दिनांक :- 20 FEB 2003

कार्यालयीन आदेश क्रमांक : ८ दिनांक : १५/२/2003

संदर्भ:-
1) या कार्यालयाचे कार्यालयीन आदेश क्रमांक 2 दिनांक 22 जून 1984.
2) कार्यालयीन आदेश क्रमांक 03 दिनांक 3 ऑगस्ट 1984.
3) कार्यालयीन आदेश क्रमांक 01 दिनांक 29 जुलै 1987.
4) कार्यालयीन आदेश क्रमांक 01 दिनांक 7 जुलै 1993.
5) कार्यालयीन आदेश क्रमांक 24 दिनांक 3 एप्रिल 1998.
6) कार्यालयीन आदेश क्रमांक 50 दिनांक 29 मार्च 2000

संदर्भ क्रमांक ५ वरील आदेशानुसार ग्रामपंचायतीचे लेखा परीक्षणासाठी लागणारे श्रमदिन सन १९९० मध्ये स्थापन केलेल्या समितीने निश्चित केलेल्या सुत्रानुसार जमा/खर्चाच्या पावत्या व उपप्रमाणके यांचे संख्येवर आधारीत नमुद केलेल्या पध्दतीप्रमाणे निश्चित करण्याचे आदेशीत करण्यात आले आहे संदर्भ क्रमांक ६ चे कार्यालयीन आदेशाद्वारे लेखा परीक्षणासाठी ग्रामनिधीचे उत्पन्न ठरवितांना त्यात ग्रामपंचायतीला शासनाकडून/ जिल्हा परिषदेकडून मिळालेले अनुदान तसेच जवाहर रोजगार योजने अंतर्गत शासनाकडून मिळालेले अनुदान जमेस धरु नयेत. केवळ ग्रामनिधीचे उत्पन्न विचारात घ्यावे या बाबत निर्देश देण्यात आले आहे मात्र या कार्यालयाचे असे निदर्शनास आले आहे की, अद्याप काही कार्यालयात/ विभागात याचे पालन करण्यात येत नाही. या उलट या कार्यालयाने वरील प्रमाणे निर्गमित कलेले संदर्भित १ ते ३ वरील आदेश ग्रामपंचायतीचे लेखा परीक्षणासाठी श्रमदिन निश्चित करण्यासाठी विचारात घेतले जातात.

वरील वस्तुस्थिती विचारात घेवून खालील प्रमाणे आदेशीत करण्यत येत आहे.

1) कार्यालयीन आदेश क्रमांक 2 दिनांक 22 जुन 1984 व कार्यालयीन आदेश क्रमांक 1 दिनांक 29/07/1987 रद्द करण्यात येत आहेत.
2) कार्यालयीन आदेश क्रमांक 3 दिनांक 03/08/1984 यापुर्वीच कार्यालयीन आदेश क्रमांक 1 दिनांक 29/07/1987 अन्वये रद्द केला आहे. तो रद्दच समजण्यात यावा.
3) यापुढे कार्यालयीन आदेश क्रमांक 1 दिनांक 07 जुलै 1993, 24 दिनांक 3 एप्रिल 1998 व 50, दिनांक 29 मार्च 2001 प्रमाणेच ग्रामपंचायतीचे लेखा परीक्षणासाठी लागणारे श्रमदिन विभागीय कार्यालयाने निश्चित करावेत. निश्चित केलेल्या एकुण श्रमदिनाची माहिती ग्रामपंचायतीचे संख्येसह या कार्यालयास विभागीय कार्यालयाने त्वरीत कळवावीत.

2/-